“ऊसतोड कामगारांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि आरोग्य स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव विज्ञान विद्याशाखेतंर्गत समाजशास्त्र या विषयातील पीएच.डी. पूर्व संशोधन आराखडा

संशोधक

गोरखनाथ बळीराम वगवाड

मार्गदर्शक

डॉ. माधव मोरे

समाजशास्त्र विभागप्रमुख

एन. डब्ल्यू. कॉलेज, आखाडा बाळापूर

ता.कळमनूरी जि.हिंगोली

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकूल

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

डिसेंबर : २०२२

प्रस्तावना

ऊसतोड कामगारांचे जगणे म्हणजे विंचवाचे बिऱ्हाड होय. कामाच्या ठिकाणी कुटुंबाचे बिऱ्हाड घेऊन जाणाऱ्या या घटकांपर्यंत कल्याणकारी योजना पोहोचल्याच नाहीत. असंघटित क्षेत्रांतील कामगार आणि त्यांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. आज अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात असंघटित कामगारांचे प्रमाण लक्षणीय आहे. सरकारी आकडेवारीनुसार, देशातील एकूण कामगारांपैकी जवळपास ९३ टक्के कामगार असंघटित क्षेत्रात आहेत. त्यांना कामगार कायद्यानुसार कामाची हमी, वेतन हमी, नैमित्तिक रजा, आरोग्य सुविधा, विमा सुविधा, निवृत्तीवेतन, इत्यादी सामाजिक सुरक्षेचे लाभ मिळत नाहीत. म्हणूनच त्यांना असंघटित कामगार असे संबोधले जाते. यामध्ये शेतीशी निगडित कामगारांचे सर्वाधिक प्रमाण आहे. याच असंघटित कामगारांमध्ये ऊसतोड कामगाराचाही समावेश होतो. इतर असंघटित कामगारांप्रमाणे ऊसतोड कामगारही दारिद्र्य, बेरोजगारी, कनिष्ठ दर्जाचे राहणीमान याच्या दुष्टचक्रातून आजपर्यंत बाहेर पडू शकले नाहीत.

राज्यात आज जवळपास १२५ साखर कारखाने सुरू आहेत. ऊस तोडणी करून या कारखान्यांना त्याचा पुरवठा करण्याचे काम ऊसतोड कामगार करतात. २०२१-२२ मधील आकडेवारीनुसार, राज्यात जवळपास साडेपाच कोटी टन ऊसाचे गाळप झाले. यापैकी ७० ते ८० टक्के ऊस हा कामगारांमार्फत कारखान्यांपर्यंत पोहोचवला गेला. यावरून ऊसतोडणी आणि साखरेचे उत्पादन यामधील ऊसतोड कामगारांची भूमिका महत्त्वाची असल्याचे दिसून येते. ऊसतोड कामगारांमुळेच आज साखर कारखानदारी जीवंत आहे. एकीकडे साखर कारखानदारी आर्थिकदृष्ट्या दिवसेंदिवस समृद्ध होत आहे तर दुसरीकडे ऊसतोड कामगारांची आर्थिक स्थिती नाजूक होत चालली आहे. वाढत्या महागाईने गर्भश्रीमंत लोकांना अनेक प्रश्न भेडसावत असतील तर तिथे ऊसतोड कामगारांचे काय हाल असतील!

महाराष्ट्रात ऊसतोडीचा हंगाम दरवर्षी साधारणतः नोव्हेंबर महिन्यात सुरू होऊन, तो मार्च-एप्रिलपर्यंत चालतो. या पाच-सहा महिन्यांसाठी कामगारांना कामासाठी राज्यातंर्गत किंवा बाहेरील राज्यात स्थलांतर करावे लागते. हंगामादरम्यान फडाच्या ठिकाणी त्यांना तात्पुरत्या खोपी किंवा पाल करून राहावे लागते. एका ठिकाणचा ऊसाचा फड संपल्यानंतर दुसऱ्या ठिकाणी बाडबिछाना हलवावा लागतो. त्यांच्या फडावर स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी वा शौचालय या सुविधांचा अभाव असतो. आज देशातील गरीब कुटुंबांना अनुदानित स्वयंपाकाचा गॅस देण्यासाठी उज्ज्वला योजना असली तरी या योजनेचा फायदा ऊसतोड कामगारांपर्यंत पोहोचली नसावी किंवा ती त्यांना परवडत नसावी हे स्पष्ट होते.

ऊसतोड कामगारांना रक्त गोठून टाकणारी थंडी, ऊन, वादळ-वारा, अवकाळी पाऊस यासारख्या अनेक नैसर्गिक समस्यांना तोंड द्यावे लागते. यांचा दिवस पहाटेच सुरू होऊन ऊस तोडणी, बांधणी आणि वाहनांमध्ये लादनी करता करता कधी संपतो ते त्यांना कळतच नाही. दिवसाकाठी तीन ते साडेतीन टन ऊस तोडून तो डोक्यावरून वाहत गाडीत भरल्यानंतरच त्यांची दिवसाची मजुरी ठरते. राज्यातील वेगवेगळ्या साखर कारखान्यांमध्ये ऊसतोड मजुरी ही वेगवेगळी आहे. त्याची सरासरीही ३७५ रुपये प्रतिटनाच्या दरम्यान येते. याचाच अर्थ या कामगारांना दिवसाकाठी जवळपास ७०० ते ८५० रुपये मजुरी मिळते. असे असले तरी त्यात सातत्य नाही, हेही तितकेच खरे. साखर कारखान्याची तांत्रिक अडचणीमुळे वेळेवर काटा न होने वा हवामानातील बदल यामुळे हप्त्यातून चार-चार दिवस कामाचे खाडे पडतात अशावेळी त्यांना मजुरी दिली जात नाही. या व्यतिरिक्त शारीरिक जोखीम ही या कामगारांच्या पाचवीला पुजलेली असते. मात्र त्यांना कोणत्याही आरोग्य सुविधा वा विमा संरक्षण मिळत नाही. ऊस तोडणी असो वा लादनी काहीवेळा अंधारातसुद्धा करावी लागते. ऊसाच्या फडातून वाहनापर्यं ऊसाची वाहतूक

करताना अनेकदा मान, पाठीच्या त्रासाला सामोरे जावे लागते. हातापायाला जखमा होतात. मात्र यापासून संरक्षण करण्यासाठी ना त्यांचा आयुर्विमा, ना आरोग्य विमा काढला जातो.

बहुतेक कामगार कामासाठी एका भागातून दुसऱ्या भागात स्थलांतर करतात. यापैकी बहुतांश कामगार भूमिहीन असल्याचे दिसते. त्यामुळे मजुरी हाच त्यांच्या जगण्याचा मार्ग होय. असे असूनही जवळपास ५० टक्क्यांवर कामगारांचा दारिद्र्य रेषेखालील यादीत समावेश नाही. त्यामुळे त्यांना त्याबाबतच्या सुविधा मिळत नाहीत. जे कामगार दारिद्र्य रेषेखाली येतात त्यांना सरकारी योजनांचा फारसा लाभ मिळालेला नाही, हेही वास्तव आहे. तसेच ऊसतोडणीसाठी जाणाऱ्या बहुतांश कामगारांचा गावातील महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये समावेश नसल्याने त्यांना त्याही योजनेचा लाभ मिळत नाही. तर ज्यांचे या योजनेत नाव आहे त्यांना वेळेवर काम मिळत नाही, पैसेही मिळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तसेच या कामगारांची स्वत:च्या गावी असलेली घरे ही कच्च्या स्वरूपातील आहेत. बहुतेक कामगारांना त्यांच्या स्वत:चा पिण्याच्या पाण्याचा स्त्रोतही नाही. त्यामुळे त्यांना पाण्यासाठी गावातील सार्वजनिक नळ, विहीर, टँकर, हातपंप किंवा बोअरवेल यांसारख्या पर्यायांवर अवलंबून राहावे लागते.

महाराष्ट्रात सुमारे १४ लाख ऊसतोड कामगार आहेत. त्यापैकी बीड जिल्ह्यातील सर्वाधिक ८ लाख ऊसतोड कामगार आहेत. यातील ८ लाखाच्या जवळपास कामगार राज्यातंर्गत ऊसतोडणीचे काम करतात. तर उर्वरीत ६ लाख ऊसतोड कामगार गुजरात, तेलंगणा, आंध्रपेदश, कर्नाटक आणि तमिळनाडू या राज्यामध्ये ऊसतोडणीसाठी स्थलांतर करतात. नांदेड जिल्ह्यातूनसुद्धा १ लाखाच्या जवळपास ऊसतोड कामगार राज्यातंर्गत व राज्याबाहेरील ऊसतोडणीसाठी स्थलांतर करतात. यामध्ये लोहा, कंधार, मुखेड, किनवट, नायगांव, माहूर हे तालुके आघाडीवर आहेत.

संशोधन समस्या

संशोधन समस्या ही संशोधनातील प्रथम पायरी आहे. त्यामुळे कोणत्याही विषयावर संशोधन करण्यासाठी संशोधकाला सर्वप्रथम संशोधन समस्या निवडणे आवश्यक असते. त्यासाठी **“ऊसतोड कामगारांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि आरोग्य स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा”** हा संशोधन विषय निवडण्यात आला आहे. हा विषय निवडण्याच्या प्रमुख कारणामध्ये ऊसतोड कामगारांकडे स्वत:ची घरे आहेत का? असतील तर त्यांचे स्वरूप कसे आहे? ते दारिद्र रेषेखाली आहेत का? असतील तर त्यांना शासनाच्या सर्व सोयी सवलती आणि योजनांचा फायदा होतो का? आरोग्यविषयक तपासण्या व सोयी सवलती मिळतात का? मुलांसाठी शैक्षणिक व्यवस्था होते का? कारखान्याकडून इतर सोयी पुरविण्याबरोबर विमाकवच मिळते का? योग्य मजुरी दिली जाते का? तसेच त्यांचा सामाजिक दर्जा, शैक्षणिक परिस्थिती व आर्थिक स्थिती कशी आहे? इत्यादी कारणांचे मूळ शोधण्यासाठी प्राधान्य दिले जाईल.

संशोधनाचे महत्त्व

ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांकडे आजपर्यंत गांभीर्याने बघीतले गेले नाही. ऊसतोडणीच्या हंगामाआधी कामगारांच्या शारीरिक तपासण्या करून हंगामानंतर त्यांच्यात कोणते बदल होतात, हे तपासून त्यानुसार आवश्यक त्या उपयोजना करता येऊ शकतात. अर्थात हे सर्व कामगारांच्या हिताचा विचार साखर कारखान्यांकडून होईल, तेव्हाच शक्य आहे. तसेच कामगारांच्या सामाजिक-आर्थिक प्रश्नांबरोबरच त्यांच्या स्वास्थ्यावर होणारा प्रत्येक परिणाम अभ्यासण्याची गरज आहे. तसेच ब्राझीलमधल्या ऊसतोड कामगारांना दररोज कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी वाहतुकीची सोय उपलब्ध करून दिलेली असते. शेतात आठ तासाच्या कामानंतर परत वाहनानेच घरी पोहोचवले जाते. कामगारांना

फ्रीजमधील शुद्ध पाणी, अल्पोपहार, मीठ आणि इलेक्ट्रोलाईट असणारी ऊर्जादायी पेये पुरवली जातात. ऊसतोड कामगारांकडे ग्लोव्हज, सुरक्षा चष्मा, गुडघ्यापर्यंत लेदरचे बूट इत्यादी संरक्षणात्मक उपकरणे पुरविली जातात. याचप्रमाणे शासन व कारखान्याकडून ऊसतोड कामगारांसाठी सुविधा व सोयीची व्यवस्था करणे महत्त्वाचे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

विषयाच्या अनुषंगाने निर्धारित केलेल्या संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे देण्यात आली आहेत.

१. नांदेड जिल्ह्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमिचा आढावा घेणे.
२. ऊसतोड कामगारांची कौटुंबिक परिस्थिती जाणून घेणे.
३. शासन व कारखान्याकडून दिल्या जाणाऱ्या महत्वपूर्ण सोयी-सुविधा व संरक्षण यांचा आढावा घेणे.
४. ऊसतोड कामगारांपुढील निर्माण होणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
५. महाराष्ट्र शासनामार्फत महत्वपूर्ण राबविण्यात येणाऱ्या योजनांचा फायदा मिळाला आहे का याचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके

विषयाच्या अनुषंगाने निर्धारित केलेल्या संशोधनाची गृहीतके खालीलप्रमाणे देण्यात आली आहेत.

१. नांदेड जिल्ह्याला ऐतिहासिक पार्श्वभूमि लाभलेली आहे.
२. ऊसतोड कामगारांची कौटुंबिक परिस्थिती फारच हलाकिची आहे.
३. शासन व कारखान्याकडून दिल्या जाणाऱ्या महत्वपूर्ण सोयी-सुविधा व संरक्षण यांचा फायदा होताना दिसून येत नाही.

४. ऊसतोड कामगारांना मुलांचे शिक्षण, आरोग्य, सामाजिक दर्जा, राहणीमान इत्यादी प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागतो.

५. महाराष्ट्र शासनामार्फत महत्वपूर्ण राबविण्यात येणाऱ्या योजनांचा फायदा ऊसतोड कामगारांना अल्प प्रमाणात होतो.

संशोधन पद्धती

संशोधन हा इंग्रजी भाषेतील Research या शब्दाचा पर्यायी शब्द आहे. इंग्रजी शब्दकोषापासून "संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे यांचे पुन्हा-पुन्हा परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय." प्रत्येक अध्ययन विषयात ज्या संकल्पना, सिद्धांत, निष्कर्ष स्वीकृत झालेले आहेत. त्यांचे प्रामाण्य पुन्हा-पुन्हा तपासून पाहणे हे त्या अध्ययन विषयांच्या अभ्यासकांचे कार्य आहे. जे सिद्धांत विभिन्न शास्त्रात प्रस्थापित झालेले आहेत. त्याची विश्वासार्हता तपासून पाहणे हे संशोधकाचे कार्‍य आहे. संशोधनामुळे मान्य झालेल्या नवीन तथ्यांच्या आधारावर प्रस्थापित ठरलेल्या सिद्धांतांत काही बदल करण्याची आवश्यकता स्पष्ट झाली, तर अशा सिद्धांताची नव्याने मांडणी करण्यासाठी संशोधनाची गरज पडते. शैक्षणिक संशोधन पद्धतीचे वर्गीकरण खालील तीन पद्धतीत करण्यात येते. प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक व सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येईल.

तथ्य संकलन पद्धती

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलन करण्यासाठी प्राथमिक व द्‌वितीय स्त्रोताचा अवलंब करण्यात येणार आहे.

तथ्य संकलनाचे स्त्रोत

- प्राथमिक तथ्य संकलन
  - प्रत्यक्ष निरीक्षण
  - प्रश्नावली
  - मुलाखती
  - अनुसूचि
  - विशिष्ट अभ्यास
- द्‌वितीय तथ्य संकलन
  - व्यक्तीगत कागदपत्रे
    - आत्मचरित्रे
    - रोजनिशी
    - पत्रे
    - संस्मरण
  - सार्वजनिक कागदपत्रे
    - शासकीय अहवाल/प्रकाशने
    - खाजगी संस्थाचे अहवाल/प्रकाशने
    - वर्तमानपत्रे/मासिके/पुस्तके
    - ऐतिहासिक कागदपत्रे

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलन करण्यासाठी प्राथमिक व द्‌वितीय स्त्रोताचा अवलंब करण्यात येणार आहे. प्राथमिक स्त्रोतात पत्यक्ष निरिक्षण, मुलाखत, तर द्‌वितीय स्त्रोतामध्ये प्रकाशित ग्रंथ, शासकीय व खाजगी संस्थाचे अहवाल, वर्तमानपत्रे. शोधप्रबंध, नियतकालीके, मासिके, त्रैमासिके, इंटरनेट इत्यादी दुय्यम साधनाचा उपयोग करण्यात येणार येईल.

नमुना निवड

नमुना निवडीच्या प्रामुख्याने संभाव्यता आणि गैर संभाव्यता अशा दोन पद्धती आहेत. ते पुढीलप्रमाणे -

नमुना निवडीचे प्रकार

- संभाव्यता नमुना निवड
  - सरळ यावृच्छिक नमुना
  - पद्धतशीर नमुना
- गैर संभाव्यता नमुना निवड
  - सोयीस्कर नमुन
  - कोटा नमुना

स्तरीय नमुना　　　　　　　　　　स्नोबॉल नमुना

↓　　　　　　　　　　　　　　↓

एकक पुंज नमुना　　　　　　　　　स्वनिर्णीत नमुना

↓

क्षेत्र नमुना

↓

बहुस्तरीय नमुना

↓

आनुपातिक नमुना

↓

नियमित चिन्हांकित नमुना

प्रस्तुत संशोधनाची प्रश्नावली भरून घेण्यासाठी यादृच्छीक नमुना निवड पद्धतीतील क्षेत्र पद्धतीचा उपयोग करण्यात येईल. क्षेत्र पध्दतीचा उपयोग करून नांदेड जिल्ह्याच्या १६ तालुके संशोधनाचे कार्यक्षेत्र असेल. प्रत्येक तालुक्यातून ऊसतोड कामगार बहूल अशा ४ गावांची निवड केली जाईल. प्रत्येक गावातून ५ या प्रमाणात एका तालुक्यातून २० उत्तरदाते निवडले जातील. तर १६ तालुक्यातून ३२० उत्तरदात्याची निवड केली जाईल.

अ.क्र.	**घटक**	**उत्तरदात्यांची संख्या**	**शेकडा प्रमाण**
१.	कारखाना संचालक	५	१.५६ %
२.	मुकादम	५०	१५.६२ %
३.	ऊसतोड कामगार	२४५	७६.५६ %
	एकूण	**३२०**	**१००.००** %

वरील कोष्टकाप्रमाणे ३२० उत्तरदात्यांची निवड केली जाईल यामध्ये ५ कारखाना संचालक असून त्यांचे शेकडा प्रमाण १.५६ टक्के आहे, ५० मुकादम असून त्यांचे शेकडा प्रमाण १५.६२ टक्के आहे तर २४५ ऊसतोड कामगार असून त्यांचे शेकडा प्रमाण ७६.५६

टक्के आहे. या प्रमाणात उत्तरदात्यांकडून मुलाखत व अनुसूचिच्या माध्यमातून माहिती संकलीत करण्यात येईल.

संशोधनाची मर्यादा

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे संशोधन सुरू होण्यापूर्वी संशोधनाची निश्चित मर्यादा ठरविणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे अवकाशात विमानाला निश्चित दिशा दाखविण्याचे काम होकायंत्र करीत असते त्याचप्रमाणे संशोधनाला निश्चित आकार प्राप्त होण्यासाठी संशोधनाला मर्यादा असणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्ह्यापुरते मर्यादीत असण्याबरोबर २०२० ते २०२४ हा कार्यकाळ निश्चित केला आहे. ही या संशोधनाची मर्यादा आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये इतर ही संदर्भ येऊ शकतात.

प्रकरणाची रूपरेषा

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : नांदेड जिल्ह्याची ओळख

प्रकरण तिसरे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण चौथे : संकलित माहितीचे अर्थनिर्वचन

प्रकरण पाचवे : सारांश, निष्कर्ष व शिफारशी

संदर्भग्रंथ

१. गुरव अनिल, हंगामी स्थलांतरित ऊसतोडणी मजूर सत्र निबंध, ज्ञान प्रबोधिनी, पुणे, २००२

२. पाटील आर.एन., ऊसतोडणी व वाहतूक कामगारांची उपेक्षा, प्रभाकर संझगिरी जीवनमार्ग १० फेब्रुवारी २००२

३. जाधव बी.जी., सहकारी साखर कारखानदारी, मराठवाड्याचा विकास दिशा, लेख, १४ जुलै १९९५

४. जाधव संपत, महाराष्ट्रातील ऊस शेती समस्या व उपाय, वसंतदादा शुगर इन्स्टिट्युत, पुणे,

५. शिरोळ, दत्त, सहकारी साखर कारखाना, महाराष्ट्रातील सहकारी साखर व्यवसाय, प्रथम राज्यव्यापी विशेषांक, १९९९

६. आठवले म.शं., महाराष्ट्रातील सहकारी चळवळ, विचार प्रकाशन, कोल्हापूर, १९९७

७. अळवंडी जी.एम., सहकार तत्त्व व व्यवहार, राजेंद्र प्रकाशन, राजेंद्रनगर, सोलापूर, १९७९

८. पाटील बा.भा., महाराष्ट्रातील साखर उद्योग : उगम व विकास सहकारी महाराष्ट्र लेख सप्टेंबर १९९३

९. जुगळे वसंत, महाराष्ट्रातील ऊस तोडणी आणि ऊस वाहतूक कामगार संख्या औद्यागिक संबंध वेतन आणि मजुरी, जून १९९३ खंड १७

१०. वाघ त्र्यंबक, ऊस तोडणी कामगारांचे सामाजिक व आर्थिक अभ्यास व १९६६

११. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, सहकारी महाराष्ट्र, ३१ वी राज्य सहकारी परिषद विशेषांक, फेब्रुवारी २००१

१२. महाराष्ट्र साखर महासंघ डायरी, अनेकांत प्रकाशन जयसिंगपूर, कोल्हापूर, २००६

१३. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., ४५ वार्षिक अहवाल, २००० मुंबई

१४. प्रदीप आगलावे, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती २०००

१५. भारतीय संस्कृतीचा एनसायक्लोपीडिया - एड. पं. महादेवशास्त्री जोशी, अनमोल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, २००३, पृ. ७४९

१६. बोधनकर व अलोणी (२००७), सामाजिक संशोधन पध्दती साईनाथ प्रकाशन, नागपूर,

१७. घाटोळे, रु. नाही. (2003), समाजशास्त्रीय तत्त्वे आणि पद्धती श्री मंगेश प्रकाशन नागपूर

१८. पाटील, बा.भा., संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २००६, पुणे

१९. www.wikipedya.org

संशोधक

मार्गदर्शक

गोरखनाथ बळीराम वगवाड

डॉ. माधव मोरे
समाजशास्त्र विभागप्रमुख
एन. डब्ल्यू. कॉलेज, आखाडा बाळापूर
ता.कळमनूरी जि.हिंगोली